# जाहिरात

## सातारा जिल्हा परिषद सातारा

## शिक्षण विभाग (प्राथमिक)

## शालेय पोषण आहार योजना

**क्र साजिप/शिक्षण /शापोआ/ प्रशा २३/२५/२०१५ दि. ०१/०६/२०१५**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत जिल्हा परिषद अंतर्गत रिक्त असणारी डेटा एन्ट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील ११ महिन्याचे कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद सातारा येथे दि. ०३/०६/२०१५ ते दि. १५/०६/२०१५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाने सुटटीचे दिवस वगळून स्वीकारले जातील.

| अ क्र | पदाचे नाव | पदांची संख्या | मासिक एकत्रित परिश्रमिक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | डेटा एन्ट्री ऑपरेटर | तालुकास्तर ७ | रु ९६००/- | १.किमान १२ वी पास<br>२. मराठी टंकलेखन ३० श प्र मि<br>३. इंग्रजी टंकलेखन ४० श प्र मि<br>४. एम एस सी आय टी किंवा तत्सम परीक्षा |

**१. वयोमर्यादा** – दि. १.१.२०१५ अखेर वय वर्षे किमान १८ व कमाल ३५

**२. निवड पध्दती** –

२.१ शैक्षणिक व व्यावसायिक अटी व पूर्ण करणाऱ्या उमेदवारास १० वी व १२ वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची एकत्रित बेरील करुन त्यामध्ये उमेदवार पदवीधर असल्यास त्यास १० गुण बोनस देउन उमेदवारांची मंजूर पदांच्या पाचपट गुणानुक्रमे यादी (मेरीट लिस्ट) तयार करणेत येईल.

२.२ सदर यादीमधील उमेदवारांची मुलाखत, संगणक व टंकलेखन प्रात्यक्षिक परीक्षा अशी एकूण ३० गुणांची परीक्षा सर्व जिल्हयामध्ये एकाच दिवशी घेण्यात येईल.ज्या ठिकाणी उमेदवार मुलाखतीस उपस्थित राहील त्याच ठिकाणी त्याच्या उमेदवारीचा विचार करण्यात येईल.

२.३ उपरोक्त नं २.१ व २.२ मधील गुण एकत्रित करुन गुणानुक्रमे मंजूर पदाएवढी निवड यादी प्रसिध्द केली जाईल आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल.

**३. सूचना** –

३.१ उमेदवारांनी विहीत नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटांवर डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज असे नमूद करावे.

३.२ अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय, अनुभव इत्यादीसंदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात.

३.३ अर्जासोबत स्वतःचे पूर्ण नाव व पत्ता असलेले 4x6 आकाराचा असलेला रिकामा , रु ५/- चे पोसटाचे तिकीट लावलेला लिफाफा पाठविण्यात यावा.

३.४ अर्ज करण्याची अंतिम तारीख १५.६.२०१५ असेल. यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

३.५ नियुक्तीपूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहीत नमुन्यात करारनामा करुन घेण्यात येईल आणि त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एंट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकारी शासनास राहतील.

३.६ कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

३.७ डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्साय नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

३.८ सदर पदांची भरती कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याने बिंदू नामावली प्रमाणे पदे भरण्याची आवश्यकता नाही.

३.९ सर्व शिक्षा अभियान अंतर्गत यापूर्वी जिल्हास्तरावरुन डेटा एंट्री ऑपरेटर पदांची भरतीचे वेळी अवलंबलेली कार्यपध्दती सदर पदांच्या संगणक व टंकलेखन प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी अवलंबविण्यात यावी.

सही/-
सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद सातारा

सही/-
अध्यक्ष,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सातारा

# जिल्हा परिषद सातारा, शिक्षण विभाग प्राथमिक
# शालेय पोषण आहार योजना – डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज – २०१५
# अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र २५ दिनांक १-६-२०१५

प्रति,
सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद सातारा

| उमेदवाराचा अलीकडच्या काळातील राजपत्रीत अधिकारी यांनी साक्षांकित केलेला पासपोर्ट साइज फोटो |
|---|

**विषय - शालेय पोषण आहार योजना सन २०१५-१६**
**डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज**

१. उमेदवाराचे अर्ज - श्री/ श्रीम. ---------------------------------------------------
(आडनाव) (स्वतःचे नाव)(वडीलांचे / पतीचे नाव)

२.पत्रव्यवहाराचा पत्ता - ---------------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------

३. जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार)-------------------------------------------
४. वय दिनांक १/१/२०१५ रोजी -----------वर्ष --------महिना-------दिवस
५. अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ क्र | परीक्षेचे नाव | परीक्षा मंडळ / विदयापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० वी | | | | |
| २ | १२ वी | | | | |
| ३ | पदवी | | | | |
| ४ | मराठी टंकलेखन | | | | |
| ५ | इंग्रजी टंकलेखन | | | | |
| ६ | एम एस सी आय टी | | | | |

अनुभव -

| अ क्र | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा कालावधी(पासून – पर्यंत) | एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती –
१.------------------------------------------------२.-------------------------------------
३.------------------------------------------------४.-------------------------------------
५.------------------------------------------------६.-------------------------------------

## प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करतो / करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रदद करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक –
स्थळ –

(उमेदवाराची स्वाक्षरी)